**Dr.Babasaheb Ambedkar Marathwada University,**
Chh. Sambhajinagar-431 004 Maharashtra, India
NAAC Re-accredited 'A' Grade
P.G.Admission Unit

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
छ. संभाजीनगर- ४३१ ००४ महाराष्ट्र, भारत
नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त
पदव्युत्तर प्रवेश विभाग

# -: परिपत्रक :-

**(सुधारित)**

**संदर्भ क्र. १) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता CET परीक्षा आयोजित करुन प्रवेश देणे बाबत प्रवेश नियामक समितीने मा. कुलगुरु महादेयांच्या अध्याक्षतेखाली झालेल्या बैठकी मध्ये केलेली शिफारस दिनांक २८-०३-२०२४, दिनांक ०५-०४-२०२४, दिनांक २९-०४-२०२४, दिनांक १०-०५-२०२४.**

**२) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता CET परीक्षा आयोजित करणे संदर्भात विद्यापीठाच्या अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस दिनांक २५-०४-२०२४, दिनांक ०६-०५-२०२४.**

**३) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता प्रवेश पात्रतेबाबतच्या सुधारित अध्यादेशास मा. कुलगुरु महादेयांनी दिलेली मान्यता दिनांक १०-०४-२०२४.**

**४) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता प्रस्तुत परिपत्रकातील नियमकास तथा CET परिक्षेच्या वेळापत्रकास मा. कुलगुरु महादेयांनी दिलेली मान्यता दिनांक ०९-०५-२०२४**

**५) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता प्रवेशाबाबत यापुर्वी प्रसिध्द करण्यात आलेले प्रस्तुत परिपत्रक दिनांक १०-०५-२०२४.**

**६) शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता प्रवेशाबाबत यापुर्वी प्रसिध्द करण्यात आलेले प्रस्तुत परिपत्रक दिनांक १४-०५-२०२४.**

मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार या परिपत्रकाव्दारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर विद्यापीठा अंतर्गत विद्यापीठ मुख्य परिसर व उप-परिसर येथे सुरु असलेल्या सर्व पदव्युत्तर विभाग यांचे शैक्षणिक विभाग प्रमुख, संचालक उपकेंद्र धाराशिव, विद्यापीठाचे सर्व अधिकारी तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेणारे पात्र विद्यार्थी यांना सुचित करण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठामध्ये सुरु असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून संदर्भ क्र. (६) अन्वये विहित करण्यात आल्यानुसार प्रसिध्द केलेल्या परिपत्रकामध्ये विनिर्दिष्टित करण्यात आलेल्या CET परीक्षेचा निकाल घोषित करणे बाबतचा दिनांक, विद्यार्थ्यांनी पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षाचे गुण विद्यापीठाच्या वेबसाईट वर नोंदणी करणे, प्रवेश प्रक्रियेबाबतच्या प्रवेश फेरी मध्ये बदल करणे इत्यादी व तत्सम बाबींसंदर्भातील वेळापत्रकामध्ये खालील प्रमाणे विनिर्दिष्टित करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानूसार प्रस्तुत परिपत्रकामध्ये सुधारित बदल करण्यात आलेला आहे.

१) प्रस्तुत प्रकरणी मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ विद्यापीठ यांनी सुचित केल्यानुसार काही तांत्रिक कारणास्तव यापूर्वी विद्यापीठाने दिनांक १४-०५-२०२४ रोजी प्रसिध्द केलेल्या वेळापत्रकानुसार पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या CET परीक्षेचा निकाल दिनांक १५-०६-२०२४ ऐवजी सदरील परीक्षेचा निकाल दिनांक २०-०६-२०२४ रोजी घोषित करण्यात येणार आहे.

२) प्रस्तुत प्रकरणी CET परीक्षेचा निकाल घोषित केल्यानंतर या विद्यापीठाचे किंवा इतर मान्यता प्राप्त समकक्ष विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षाचे गुण

प्रवेश घ्यावयाच्या पात्र अभ्यासक्रमास विषयनिहाय / अभ्यासक्रमनिहाय विद्यापीठाच्या https://bamuadm.samarth.edu.in या संकेत स्थळावर दिनांक २२-०६-२०२४ ते ०१-०७-२०२४ पर्यंत प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक असून अर्जदार विद्यार्थ्याने पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षाच्या ऐच्छिक विषयामध्ये संपादन केलेले गुण विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील निर्धारित करण्यात आलेल्या फॉरमॅट / प्रारुपामध्ये भरणे अनिवार्य आहे तसेच सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी शैक्षणिक दस्तऐवजासह सदरील नोंदणी पुर्ण झाल्यानंतर प्रवेश आवेदन पत्राची एक कॉपी डाऊनलोड करुन संबंधित विभागाकडे पुरक दस्तऐवजासह हार्ड कॉपी जमा करण्यात यावी.

३) प्रस्तुत प्रकरणी सर्व संबंधित विभागाने प्राप्त प्रवेश आवेदन पत्रांची दिनांक ०२-०७-२०२४ ते ०४-०७-२०२४ पर्यंत छानणी तपासणी करुन नियमामध्ये विहित केल्यानुसार विहित केलेल्या प्रक्रियेने सर्व संबंधित पात्र विद्यार्थ्यांची विभाग प्रमुखांनी दिनांक ०४-०७-२०२४ रोजी सर्वसाधारण गुणवत्ता यादी / General Mirit list घोषित करण्यात यावी.

४) प्रस्तुत प्रकरणी अर्जदार विद्यार्थ्यांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी बाबात काही तक्रारी प्राप्त झाल्यास सदरील तक्रारींचे विभागीय स्तरावर विभाग प्रमुखांनी दिनांक ०५-०७-२०२४ व दिनांक ०६-०७-२०२४ रोजी प्राप्त तक्रारीनुसार विद्यार्थ्यांचे म्हणने ऐकूण घेवून सुधारीत सर्वसाधारण गुणवत्ता यादीं / General Mirit list तात्काळ घोषित करण्यात यावी.

५) प्रस्तुत प्रकरणी विद्यापीठाच्या विभाग प्रमुखांनी नियमामध्ये विहित केल्यानुसार विहित करण्यात आलेल्या आरक्षणाप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमतेच्या अधिन राहून दिनांक ०८-०७-२०२४ रोजी प्रथम प्रवेश यादी विद्यापीठाच्या संकेत स्थळावर तसेच विभागाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात यावी.

६) प्रस्तुत प्रकरणी दिनांक ०८-०७-२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रथम प्रवेश यादीप्रमाणे सर्व संबंधित पात्र विद्यार्थ्यांना दिनांक ०९-०७-२०२४ ते ११-०७-२०२४ पर्यंत सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी विहित शैक्षणिक शुल्काचा विद्यापीठाच्या लेखा विभागामध्ये भरणा करुन संबंधित विभागामध्ये मुळ दस्ताऐवज सादर करुन प्रवेश प्रक्रिया पुर्ण करुन घेण्यात यावी.

७) प्रस्तुत प्रकरणी अभ्यासक्रमनिहाय / विषयनिहाय रिक्त राहीलेल्या जागेनुसार सर्व संबंधित विभागांनी दिनांक १२-०७-२०२४ रोजी विहित केलेल्या नियमानुसा विहित केलेल्या प्रक्रियेने व्दितीय यादी जाहीर करण्यात यावी.

८) प्रस्तुत प्रकरणी दिनांक १२-०७-२०२४ रोजी घोषित केलेल्या व्दितीय यादी नुसार दिनांक १३-०७-२०२४ ते १६-०७-२०२४ पर्यंत सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी विहित शैक्षणिक शुल्काचा विद्यापीठाच्या लेखा विभागामध्ये भरणा करुन संबंधित विभागामध्ये मुळ दस्तऐवज सादर करुन प्रवेश प्रक्रिया पुर्ण करुन घेण्यात यावी.

९) प्रस्तुत प्रकरणी अभ्यासक्रमनिहाय / विषयनिहाय रिक्त राहीलेल्या जागेनुसार सर्व संबंधित विभागांनी दिनांक १८-०७-२०२४ रोजी विहित केलेल्या नियमानुसार विहित केलेल्या प्रक्रियेने तृतीय यादी जाहीर करण्यात यावी.

१०) प्रस्तुत प्रकरणी दिनांक १८-०७-२०२४ रोजी घोषित केलेल्या तृतीय यादी नुसार दिनांक १९-०७-२०२४ ते २०-०७-२०२४ पर्यंत सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी विहित शैक्षणिक शुल्काचा विद्यापीठाच्या लेखा विभागामध्ये भरणा करुन संबंधित विभागामध्ये मुळ दस्तऐवज सादर करुन प्रवेश प्रक्रिया पुर्ण करुन घेण्यात यावी.

११) प्रस्तुत प्रकरणी अभ्यासक्रमनिहाय / विषयनिहाय रिक्त राहीलेल्या जागेनुसार सर्व संबंधित विभागांनी दिनांक २२-०७-२०२४ रोजी कार्यालयीन वेळेत स्पॉट ॲडमिशनव्दारे विद्यापीठाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार सर्व संबंधित पात्र विद्यार्थ्यांना विहित शुल्काचा भरणा व मुळ दस्तऐवज तपासणी केल्यानंतर प्रवेश देण्यात यावेत.

१२) प्रस्तुत प्रकरणी विद्यापीठ मुख्य परिसर व उपपरिसर धाराशिव येथे सुरु असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास विहित प्रक्रियेने प्रवेश घेण्यासाठी CET परीक्षा देण्याकरिता नोंदणी झालेल्या विद्यार्थी संख्येचे अवलोकन केले असता बहुतांश विभागामध्ये निर्धारित प्रवेश क्षमतेपेक्षा कमी नोंदणी झालेली असल्यामुळे विहित केलेल्या प्रक्रियेनुसार दिनांक ११-०७-२०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्रथम फेरीचे प्रवेश संपन्न झाल्यानंतर ज्या विभागामध्ये निर्धारित प्रवेश क्षमतेपेक्षा कमी प्रवेश आवेदन पत्र प्राप्त झालेले आहे / CET परीक्षेकरिता कमी नोंदणी झालेली आहे, अशा सर्व संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांनी नियमामध्ये विहित केल्यानुसार विहित केलेल्या प्रक्रियेने निर्धारित केलेल्या आरक्षणानुसार गुणवत्तेप्रमाणे दिनांक १२-०७-२०२४ ते दिनांक २२-०७-२०२४ पर्यंत पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावे.

१३) प्रस्तुत प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांनी दिनांक ३१-०७-२०२४ पर्यंत संबंधित विभाग प्रमुखांच्या स्वाक्षरीसह Eligibility Certificate / पात्रता प्रमाणपत्र विद्यापीठाच्या पात्रता विभागास सादर करण्यात यावे.

१४) प्रस्तुत प्रकरणी शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी CET परीक्षेबाबत तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमास नोंदणी करणे संदर्भात आवश्यक सूचनांचे अवलोकन करण्यासाठी विद्यापीठाच्या https://bamuadm.samarth.edu.in या संकेत स्थळावर वेळोवेळी व नियमितपणे भेट देण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणी पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी उपरोक्त प्रमाणे विनिर्दिष्टित करण्यात आल्यानुसार मुद्दा क्र. १ ते १४ अन्वये विहित करण्यात आलेल्या सूचना वजा आदेश वगळून विद्यापीठाने दिनांक १४-०५-२०२४ रोजी घोषित केलेल्या परिपत्रकामध्ये इतर कोणत्याही बाबींसंदर्भात बदल करण्यात आलेला नाही, याबाबत सर्व संबंधितांनी गांर्भियाने नोंद घेण्यात यावी.

**संदर्भ क्र. परिपत्रक / पदव्युत्तर विभाग / प्रवेशाबाबत / २०२४-२०२५ / 4927-4977**
**दिनांक १४-०६-२०२४**

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Aurangabad *

**उपकुलसचिव**
**(पदव्युत्तर विभाग)**

प्रतिलिपी :

१) मा. कुलगुरु महोदय यांचे स्वियसहाय्यक, कुलगुरु कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
२) मा. प्र कुलगुरु महोदय यांचे स्वियसहाय्यक, प्र कुलगुरु कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
३) मा. कुलसचिव यांचे स्वियसहाय्यक, कुलसचिव कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
४) मा. अधिष्ठाता (सर्व विद्याशाखा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
५) मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
६) मा. संचालक, उपकेंद्र धाराशिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
७) मा. विभाग प्रमुख, सर्व विभाग, विद्यापीठ मुख्य परिसर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
८) मा. विभाग प्रमुख, सर्व विभाग, विद्यापीठ उप-परिसर धाराशिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
९) मा. संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
१०) जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालया, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.